रुपये.

४,२००००.

पै॥ वजा दिल्लीचे मुकामीं खर्चास घेतले ८८००.

बाकी ४,११,२००

खर्च.

६०,००० धोंडोबा नाईक नवाळे यांसी रो॥ नारो शंकर यांनीं देविला, छ ९ जमादिलावलीं.

१,१०,००० र॥ लष्कर श्रीमंत स्वामीकडे बराबर कृष्णराव बल्लाळ दि॥ पायगाडे, छ १३ जमादिलावलीं.

७३,९६३॥ ब॥ वराता हुजूर.

१०,००० अंताजी माणकेश्वर वरात वीस हजार पैकीं,
छ १५ जिमादि.

१४,८६२॥ पतक नारायणराव बापू, छ १५ जमादिलावलीं.

९,२२१॥ वरात १.

५,६४१ वरात १.

१४,८६२॥.

७५६ जानराव ढमढेरे छ १५.

२३३५ रंभाजी कदम छ १५ र॥.

२१८५ वरात १.

१५० वरात १.

२३३५

६,००० त्रिंबकराव सदाशिव छ १६

८,४६८ लखजी बोधे छ १८ जा॥वल.

१०,००० शिदाप्पा शेटे वीरकर छ १८ जा॥.

७,९९६ कृष्णाजी अनंत छ २३ जा॥वल.

८०० राघो निळकंठ छ २४ जमा॥वल.

१५० विठ्ठलराव शिवदेव छ २३.

१२,५९६ पा॥ रा॥ हुजूर रोजमोरा दीडमाही छ २९ जमादि-
[ लावलीं.

७३,९६३॥.

१४,६५०० रवाना लष्कर श्रीमंत स्वामीकडे बराबर पाराशरदाजी छ

२४ जमादिलावलीं १,५०००० .

पैकींवजा

३,००० छ मा॥र स्वार फिरोन आले सुमार ६.

५०० छ २९ जमादिलावलीं हुल्लड जाली तेथून स्वार आला १.

३५००.

बाकी —————————————————— रुपये.

७८६ पागेची चंदीची बेगमी.

१७६ पागा जानराव ढमढेरे इ॥ छ १३ जमादिलावल ता॥ छ २८ जमादिलावल रोज १६ दररोज रु॥ ११

प्रे॥ —————————————— रुपये.

३६० पागा लखजी बोधे इ॥ ता॥ छ ३० जमादिला-
वल आंठरा रोज दररोज रु॥ २० प्रे॥.
२५० पागा नि॥ रंभाजी कदम यांसी मोहगम बेगमी.

।७८६

३,११२४९॥.
बाकी ता॥ छ ३० जमादिलावलीं —— रुपये.
२८,७५०॥.

ता॥

रुपये दिल्हे. वरात कबज घेतली असे.

२,००० गणेश गंगाधर यांची वरात देणें असे. रो छ ५ जमादिलाखर पावली गु॥ पांडुरंग बाबूराव.

२६,७५०॥ ऐन शिलक.

२६,७५० ता॥ धोंडोबा नाईक.
·॥· ता॥ पांडुरंग बाबू.

२६,७५०॥.

२८,७५०॥.

२६,७५०॥ छ ३० जमादिलावलीला धोंडोबा नाईक नवाळे यांजकडे —— रुपये.

२८७५ छ ५ जमादिलाखर.

१८७५ पागा दारकोजी निंबाळकर वरात.
१००० सटवाजी जाधवराऊ.

८०० वरात १.
२०० वरात १.

१०००

२८७५.

बाकी —————————————————————————— रुपये.

२३,८७५॥.

वजा केले ते रु॥ ६८०० बाकी रुपये.

१७०७५॥.

पैकी वजा महीपतराव

चिटणीस याजब॥ २०००.

बाकी १५०७५॥.

छ २३ जमादिलाखर मु॥ भिंड. येणेंप्र॥ नारो शंकर याजकडे याद लेहून दिल्ही असे.

———

३२४ २४ जमादिलावल ह्मणजे २ जानेवारी १७६१ ह्या रोजीं पाराशरदादाजी, प्रत्येकीं पांचपांचशें रुपयांची एकेक थैली घेणारा असे, तीनशें स्वार घेऊन पाणिपताकडे दिल्लीहून रवाना झाला. खजिन्याबरोबर बंदोबस्ताकरितां आणीक चारपांचशें स्वार होते. पैकीं २४ जमादिलावलीं ६ स्वार परत आले व २९ जमादिलावलीं ह्मणजे ७ जानेवारी १७६१ रोजीं एक स्वार परत आला. कारण हुल्लड झाली. २४ जमादिलावलीं सहा

स्वार परत आले ते कांहीं इतर कारणानें आले. २९ जमादिलावलचा मात्र, हुल्लड झाली ह्मणून परत आला. पाराशरदादाजी चोविस तारखेला दिल्लीहून निघाला तो २६ तारखेच्या रात्रीं अबदालीच्या लष्करापाशीं चुकून गेला. तेथें रात्रीं चकमक झाल्यावर एक स्वार निघाला तो २९ तारखेला दिल्लीस परत आला. ही हुल्लड पांच जानेवारीला झाल्यावर नऊ दिवसांनीं पानिपतचें मोठें युद्ध झालें. पानिपतचें शेवटलें युद्ध कोणत्या तारखेस झालें याबद्दल बराच मतभेद आहे. ७ जानेवारी, ८ जानेवारी, १२ जानेवारी व १४ जानेवारी ह्या तारखा निरनिराळ्या ग्रंथकारांनीं दिल्या आहेत. पानिपतची लढाई हिंदूंच्या पौषांत व यवनांच्या जमादिलाखरांत झाली. लढाईच्या दिवशीं बुधवार होता. त्याअर्थी १४ जानेवारी १७६१ ही तारीख विश्वसनीय ठरते. रा. डफ, कीन, मालेसन, साने इत्यादि मंडळींनें सातवी तारीख घेतली आहे. रा. नातू, ठाकूर इत्यादि १४ जानेवारी पसंत करितात. आमच्या मतें १४ तारीखच खरी असावी. ( १ ) कारण, ह्या तारखेच्या बाजूला बखरींचें बहुमत आहे. ( २ ) पौष शु॥ ८ ही तीथ पानिपतची हे महाराष्ट्रांत आबालवृद्धांच्या तोंडीं झालेलें दिसतें. ( ३ ) मुसलमानांनाहि ६ जमादिलाखर हीच तारीख पसंत आहे. ( ४ ) हिंदूंचा पौषांत व यवनांचा जमादिलाखरांत बुधवार अष्टमीला व ६ व्या तारखेला यावयाचा ह्मणजे १४ जानेवारी हीच तारीख ध्यावी लागते. हा एवढा पुरावा १४ व्या तारखेच्या प्रीत्यर्थ दिला खरा. परंतु, अस्सल पत्राचा पुरावा हातीं येईल तर त्याहूनहि ठामपणें हीच तारीख खरी असें बिनहरकत ह्मणतां येईल. कारण, हजारों नामी तर्कांपेक्षां एक अस्सल चिटोरें जास्त महत्वाचें असतें.